# Washim District Police

**Nature of Work** :- **Recovery of Missing Chilren**

**Police Station** :- **Karanja**

**Date of Good Work done** :- **28/09/2020**

**Brief of the work done :-**

कारंजा शहर पोलिसांनी अवघ्या आठ तासात शोधली बेपत्ता मुलगी. दि. २७/०९/२०२०

## अवघ्या आठ तासात शोधली बेपत्ता मुलगी

**कारंजा (लाड), ता.२८ :** एक १९ वर्षीय मुलगी २३ सप्टेंबरच्या सकाळी ११ वाजतापासून बेपत्ता असल्याची तक्रार फिर्यादीने २४ सप्टेंबर रोजी कारंजा शहर पोलिस स्टेशनमध्ये दाखल केली होती. दाखल फिर्यादीवरून शहर पोलिसांनी मिसिंग क्रमांक १६/२०२० दाखल करून बेपत्ता मुलीच्या शोधासाठी तपासचक्र फिरविणे सुरू केले.

कारंजाचे उपविभागीय पोलिस अधिकारी संजय पाटील व कारंजा शहर पो.स्टे.चे ठाणेदार सतीश पाटील यांच्या मार्गदर्शनात बेपत्ता मुलीला शोधण्याचे काम जमादार गजानन वर, रामराव लडके व सुनील टाले यांच्याकडे सोपविण्यात आले होते.

उपरोक्त तीन पोलिस कर्मचाऱ्यांनी कर्तव्यदक्षता दाखवित मोबाईल लोकेशनच्या मदतीने अवघ्या आठ तासात बेपत्ता मुलगी शोधली.

बेपत्ता मुलीचे मोबाईल लोकेशन अकोला येथे आढळून आल्याने पोलिस कर्मचाऱ्यांनी बेपत्ता मुलीच्या वडिलांना सोबत घेऊन अकोला गाठले व मुलगी शोधून वडिलांची मुलीशी भेट घालून दिली.

## कारंजा शहर पोलीसांनी अवघ्या आठ तासात शोधली बेपत्ता मुलगी

**कारंजा** ▪ तालुका प्रतिनिधी

पोलीस कर्मचाऱ्यांनी मोबाईल लोकेशनच्या मदतीने अवघ्या आठ तासात बेपत्ता मुलगी शोधली.

एक १९ वर्षीय मुलगी २३ सप्टेंबर रोजी सकाळी ११ वाजतापासून बेपत्ता असल्याची तक्रार फिर्यादीने २४ सप्टेंबर रोजी कारंजा शहर पोलीस स्टेशनमध्ये दाखल केली होती. दाखल फिर्यादीवरून शहर पोलीसांनी मिसिंग क्रमांक १६/२०२० दाखल करून बेपत्ता मुलीच्या शोधासाठी तपासचक्र फिरविणे सुरू केले. कारंजाचे उपविभागीय पोलीस अधीकारी संजय पाटील व कारंजा शहर पो स्टे चे ठाणेदार सतीश पाटील यांच्या मार्गदर्शनात बेपत्ता मुलीला शोधण्याचे काम जमादार गजानन वर , रामराव लडके व सुनील टाले यांच्याकडे सोपविण्यात आले होते. उपरोक्त तीन पोलीस कर्मचाऱ्यांनी आपली कर्तव्यदक्षता दाखवित मोबाईल लोकेशनच्या मदतीने अवघ्या आठ तासात बेपत्ता मुलगी शोधली. बेपत्ता मुलीचे मोबाईल लोकेशन अकोला येथे आढळून आल्याने पोलीस कर्मचाऱ्यांनी बेपत्ता मुलीच्या वडिलांना सोबत घेऊन अकोला गाठले व मुलगी शोधून वडिलांची मुलीशी भेट घालून दिली. पोलीसांच्या या कर्तव्य तत्परतेसाठी त्यांचे कौतुक केल्या जात आहे.

ePaper देशोन्नती
Sun, 27 September 2020
https://deshonnati.digitaledition.in/c/55278031